डॉ.बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ, दापोली
मध्यवर्ती संशोधन केंद्र, वाकवली

# सडवे विभाग

जा. क्र मसंके/प्रअस/दरपत्रक/१२२/ /२०२२ दिनांक ०८.१२.२०२२

## नोटीस

मध्यवर्ती संशोधन केंद्र, वाकवली अंतर्गत सडवे विभागामध्ये जलसंचयनासाठी खडडा खोदणे, सुपारीला पाणी देण्यासाठी रींगा तयार करणे, पाट तयार करणे, सुपारीबागेत बांधबंदिस्ती करणे, नारळ लागवडीसाठी खडडे खोदणे, नारळ लावणे इ. कामे करून घेण्यासाठी ठेकेदारांकडून दरपत्रके मागविण्यात येत आहेत. सदरची कामे ही दिनांक ०२.०१.२०२३ ते दिनांक १७.०२.२०२३ या कालावधीमध्ये करावयाची असून त्याचा तपशिल खालील प्रमाणे देण्यात येत आहे.

| अ.क | कामांचा तपशिल |
|---|---|
| १ | जलसंचयनासाठी खडडा (१२ फूट व्यास आणि १० फूट खोली) खोदणे |
| २ | सुपारीला पाणी देण्यासाठी रींगा तयार करणे (८५० रींगा) |
| ३ | सुपारीला पाणी देण्यासाठी पाट तयार करणे |
| ४ | सुपारी बागेत बांधबंदिस्ती करणे |
| ५ | नारळ लागवडीसाठी खडडे खोदणे,नारळ लावणे. ( २० खडडे आकारमान १X१X१ घनमीटर) |

वरील प्रमाणे कामे करण्यासाठी ठेकेदारांनी एकूण कामाच्या स्वरूपाची पाहणी प्रत्यक्ष करुन आपली दरपत्रके दिनांक **२२.१२.२०२२** पर्यंत बंद लखोटयामध्ये संचालक, मध्यवर्ती संशोधन केंद्र,वाकवली ता. दापोली,जि. रत्नागिरी यांचेकडे सादर करावे. याबाबतच्या अटी व शर्ती खालील प्रमाणे

- ठेकेदाराने ठेका सादर करण्या पूर्वी प्रत्त्यक्ष प्रक्षेत्रावर एकूण कामाचे स्वरुप पाहून दरपत्रकामध्ये दर सादर करावेत.
- ठेका मंजूरी आदेश प्राप्त होताच मंजूर आदेश पत्राव्दारे दिलेल्या दिनांकापासून निम्न स्वाक्षरीकार/विभागप्रमुख/प्रक्षेत्र अधिक्षक यांनी दिलेल्या सूचनेनूसार व त्यांचे देखरेखीखाली ठेक्याचे काम करावयाचे आहे.
- ठेकेदाराने नेमलेल्या मजूरांना श्रम व रोजगार मंत्रालय नवी दिल्ली यांचा एफ न/१३ (१)२०१७.एल एस—११ दिनांक १७.०३.२०१७ च्या अनुषंगाने शासनाच्या किमान वेतनदरानुसार वेतन देण्यात येते, असे प्रमाणपत्र ठेकेदाराचे देयक कार्यालयास सादर करतेवेळी देयका सोबत सादर करणे आवश्यक आहे. प्रमाणपत्र देयका सोबत नसल्यास देयकाची अदायगी करता येणार नाही.
- कामाची अदायगी महिना/कामपूर्ण झाल्यावर करण्यात येईल/ ठेका संपल्यानंतर करण्यात येईल. संबधित देयक सादर करताना विभाग प्रमुख/प्रक्षेत्र प्रमुख/प्रक्षेत्र अधिक्षक यांचे कडील कामे वेळेत पूर्ण केलेबाबतचा दाखला देयका सोबत जोडणे बंधनकारक राहिल.
- ठेका अपूर्ण सोडल्यास ठेकाच्या बीलांची आदायगी होणार नाही व सदर कामाचा अनुभव पुढील ठेक्याच्या वेळी गृहीत धरला जाणार नाही. तसेच संबधीत ठेकेदाराचे दरपत्रक / निविदा पुढील ठेक्याच्या वेळी ग्राहय धरले जाणार नाही.
- प्रक्षेत्रावरील कामासाठी आवश्यक निविष्ठांचा पुरवठा संबधीत कार्यालयामार्फत केला जाईल.

- पुरविण्यात आलेल्या निविष्ठा कार्यालयीन वेळ संपल्यानंतर दररोज संबधीतांकडे जमा करावयाचे आहे. औजारे नादुरुस्त झाल्यास दुरुस्तीसाठी होणारा खर्च ठेकेदाराच्या देयकामधून वसूल केला जाईल.
- प्रक्षेत्रावर दिलेल्या सुचनेनुसार करावयाची कामे विभागाच्या सोयी व गरजेनुसार ठेकेदाराने करणे बंधन कारक असेल, सुचनांचा अवमान केल्यास ठेका त्वरीत बंद केला जाईल. आणि त्या बाबत ठेकेदारांच्या कोणत्याही तक्रारीची दखल घेतली जाणार नाही.
- ठेकेदाराने पॅनकार्ड व बॅक खाते जोडणे बंधनकारक आहे.ठेकेदाराच्या देयकांची अदायगी त्यांचे बॅक खाती एन ई एफ टी/ आर.टी.जी. एस. /धनाकर्षाव्दारेकरण्यात येईल.
- ठेकेदाराने कामावर ठेवलेल्या कामागारांना अपघात/ सर्पदंश/विचूंदंश झाल्या संबधीत कामगारावर योग्य ते उपचार करण्याची सर्वस्वी जबाबदारी ठेकेदारांची राहिल. त्यासाठी आलेल्या खर्चाची अदायगी या कार्यालयाव्दारे करण्यात येणार नाही.
- कामाच्या कालावधीत ठेकेदार अथवा त्याच्या कामगाराकडून/ मंजूराकडून प्रक्षेत्राच्या माल मत्तेचे नुकसान झाल्यास ठेकेदाराच्या देयकामधून संबधीत नुकसानीची किंमत वसूल करण्यात येईल आणि त्याबाबत ठेकेदारवर कायदेशीर कार्यवाही करण्याचा अधिकार निम्नस्वाक्षरीकार यांना असेल.
- ठेकेदारामार्फत पुरविण्यात आलेल्या सेवा सुविधा तसेच त्याच्या कार्यपध्दतीचा आढावा कार्यालयामार्फत वेळोवेळी घेण्यात येईल. कार्यालयाने दिलेल्या सुचनाचे काटेकोरपणे पालन करणे ठेकेदारांस बंधनकारक आहे. तसे न केल्यास ठेकेदारांस देण्यात आलेला ठेका कोणत्याही वेळी रदद करण्याचा अधिकार निम्नस्वाक्षरीकार यांनी राखून ठेवला आहे.
- सर्वोच्च न्यायालयाने निर्धारित केलेल्या याचिका क्र एस.एस.पी.५४५३/९० नुसार ठेकेदाराने नेमलेल्या मजूरास/इसमास ठेका कालावधीमध्ये/ठेका कालवधीनंतर विद्यापीठ /शासकीय सेवेत कायमस्वरुपी नोकरी मिळण्यास अधिकार राहणार नाही.
- ज्या कंपनीस/संस्थेस/व्यक्तीस ठेका देण्यात येईल त्यांनी उपरोक्त अटी व शर्ती मान्य असलेबाबत करार लिखित स्वरुपात करणे बंधनकारक राहिल. कंपनी /संस्थतर्फे/ ठेकेदारा मार्फत कामावर ठेवलेल्या कर्मचाऱ्यांचे ठेवलेले कोणतेही उत्तरदायित्व शासनावर किंवा विद्यापीठावर असणार नाही.

संचालक,
मध्यवर्ती संशोधन केंद्र, वाकवली,
ता.दापोली,जि.रत्नागिरी.

प्रत, माहितीसाठी व प्रसिध्दीसाठी:—

१. नोटीस बोर्डवर लावण्यासाठी
२. ग्रामपंचायत कार्यालय सडवे/असोंड/शिवाजीनगर साखळोली/गावतळे